महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक : २२५१/१४४२/पोउनि-मविप/२०२१/१५** **दिनांक :२७ ऑक्टोबर, २०२१**

# घोषणा

**विषय:- पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा शारीरिक चाचणीचे सुधारित निकष**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेतील शारीरिक चाचणीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

| **पुरूषांसाठी** | | **महिलांसाठी** | |
|---|---|---|---|
| १ | गोळा फेक- वजन- ७.२६० कि.ग्रॅ.<br>कमाल गुण- १५ | १ | गोळा फेक- वजन- ४ कि.ग्रॅ.<br>कमाल गुण- २० |
| २ | पुल अप्स - कमाल गुण- २० | २ | धावणे - (२०० मीटर्स) - कमाल गुण- ४० |
| ३ | लांब उडी - कमाल गुण- १५ | ३ | चालणे - (३ कि.मी.) -<br>कमाल गुण- ४० |
| ४ | धावणे - (८०० मीटर्स) - कमाल गुण- ५० | | |
| **एकूण गुण - १००** | | **एकूण गुण - १००** | |

२. सदर परीक्षेतील शारीरिक चाचणीच्या निकषांमध्ये बदल करण्याची बाब आयोगाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

**२.१ पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षामध्ये अंतिम निवडीकरीता विचारक्षेत्रात येण्यासाठी शारीरिक चाचणीत किमान ४५% गुण मिळवणे आवश्यक राहील.**

**२.२ शारीरिक चाचणीचे गुण प्रचलित पध्दतीप्रमाणे अनिवार्य ठेवण्यात आले असून अंतिम निकाल तयार करताना या गुणांचा विचार करण्यात येईल.**

**२.३ सर्व शारीरिक चाचणीतील एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवून, शारीरिक चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.**

३. उपरोक्त सुधारणा यापुढे प्रसिध्द होणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेपासून लागू राहतील.

**ठिकाण : मुंबई**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**